महाराष्ट्र नागरी सेवा : शिस्त व अपिल १९७९

तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्यासाठी सादरीकरण (वेळ मर्यादा ९० मिनिटे)

सुस्वागतम्

महाराष्ट्र नागरी सेवा

शिस्त व अपिल नियम १९७९
व
विभागीय चौकशी पुस्तिकावर आधारित

म. ना. से. शिस्त व अपिल नियम: पार्श्वभूमी

- या नियमांची अंमलबजावणी दि. १२/०७/१९७९ पासून.
- सदर नियम वर्ग १, वर्ग २, वर्ग ३, वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना लागू.
- अखिल भारतीय सेवेतील कर्मचारी उदा: IAS/ IFS/ IPS इ. ना लागू नाही.
- पोलीस निरिक्षक व त्याखालील पोलीस दलातील लोकांस लागू नाहीत. त्यांचेसाठी स्वतंत्र नियम.
- याशिवाय दैनंदिन रोजगारावरील कर्मचाऱ्यांना हे नियम लागू नाहीत.

१) नियुक्ती प्राधिकारी

- ज्या पदावर कर्मचारी कार्यरत आहे त्या पदावर नियुक्ती करण्यास सक्षम अधिकारी.

२) शिस्त भंग विषयक प्राधिकारी

१. या नियमानुसार शिक्षा देण्यास सक्षम असलेला प्राधिकारी.

२. नियुक्ती प्राधिकारी हाच गंभीर शिक्षा देण्यास सक्षम.

३. सौम्य शिक्षा देण्यासाठी वर्ग ३ व वर्ग ४ कार्यालय प्रमुख सक्षम.

क्रमशः

२) शिस्त भंग विषयक प्राधिकारी

४. राजपत्रित अधिकाऱ्यांना सौम्य शिक्षा देण्यासाठी विभाग प्रमुख सक्षम.

५. राज्यपाल हे कोणत्याही कर्मचाऱ्यास शिक्षा देण्यास सक्षम.

६. प्रत्येक नियुक्ती अधिकारी हा शिस्तभंग विषयक प्राधिकारी आहे पण शिस्तभंग विषयक अधिकारी हा नियुक्ती अधिकारी नाही.

अपिलीय अधिकारी

१. शिक्षा देणाऱ्या अधिकाऱ्याच्या निकटतम वरिष्ठ अधिकारी अपिलीय अधिकारी.

२. शिक्षा देणारा अधिकारी शासनाच्या निकटतम कनिष्ठ असल्यास शासन अपिलीय अधिकारी.

३. शासनाने शिक्षा दिल्यास अपील राज्यपालांकडे करता येईल.

शिस्तभंग

- म.ना.से. (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियमांचा कर्मचाऱ्यांकडून भंग.
- प्रस्तुत नियमातील नियम ३ - शासकीय कर्मचाऱ्यास अशोभनीय वर्तन या खाली बहुतांशी प्रकरणात कार्यवाही सुरु.
- संशयास्पद सचोटी / शासनास फसविणे /शासकीय मालमत्तेचे नुकसान / शासकीय संपत्तीचे अपहरण / वरिष्ठांचा अपमान / आर्थिक अनयिमितता / प्रशासकीय अनियमितता / भ्रष्टाचारी वर्तन / नैतिक अध:पतन / गुन्हेगारी कृत्य

क्रमशः

शिस्तभंग

- वरील किंवा इतर कोणत्याही बाबींबाबत कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करता येईल.
- भारतीय राज्य घटना कलम ३११ प्रमाणे कोणत्याही कर्मचाऱ्यास बचावाची संधी दिल्याशिवाय शिक्षा देता येणार नाही.

शिक्षेचे प्रकार

<u>सौम्य शिक्षा</u>

१. ठपका ठेवणे.
२. पदोन्नती रोखणे.
३. आर्थिक नुकसानींची भरपाई.
४. वेतनवाढी थांबविणे.

शिक्षेचे प्रकार

जबर शिक्षा

१. वेतनश्रेणीच्या खालच्या टप्प्यावर आणणे.
२. खालच्या समयवेतन श्रेणीत आणणे / पदावर पदावनत करणे.
३. सक्तीची निवृत्ती.
४. सेवेतून काढून टाकणे.
५. सेवेतून बडतर्फ करणे.

पद नष्ट झाल्यामुळे झालेली पदावनती किंवा सेवेतून काढून टाकणे / परीक्षा उत्तीर्ण नाही म्हणून रोखलेली वेतनवाढ / दक्षता रोध हे शिक्षेचे प्रकार नाहीत.

निलंबन
का ? कोणी ? केव्हां ?

- हा शिक्षेचा प्रकार नाही.
- ही प्रशासकीय कार्यवाही.
- यासाठी कारणे दाखवा नोटीस देण्याची गरज नाही.
- संशयास्पद प्रकरणी रेकॉर्ड बदलणे/ नष्ट करणे/ साक्षीदारांवर दबाव आणणे या बाबी रोखण्यासाठी किंवा गंभीर शिक्षा लावण्याची शक्यता/ फौजदारी गुन्ह्यात सहभाग / राज्याची सुरक्षितता धोक्यात येत असल्यास.
- ४८ तासांपेक्षा जास्त पोलीस कस्टडी अथवा तुरुंगवास असल्यास निलंबित समजण्यात येईल. तुरुंगवासाची शिक्षा झाल्यास तात्काळ नोकरीतून काढता येत नाही म्हणून निलंबित समजण्यात येईल.

सक्षमता

- नियुक्ती प्राधिकारी अथवा त्यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी सक्षम आहेत.
- नियुक्ती प्राधिकाऱ्यांपेक्षा कमी दर्जाचा अधिकाऱ्याने म्हणजेच शिस्तभंग विषयक अधिकाऱ्याने निलंबित केल्यास अहवाल नियुक्ती प्राधिकाऱ्यास पाठविणे आवश्यक.
- शासन अथवा राज्यपाल हे कोणत्याही कर्मचाऱ्यास निलंबित करु शकतात.

निर्वाह भत्ता

१. निलबंनापूर्वीच्या वेतनाच्या ५० %
२. त्यावर आधारे महागाई भत्ता.
३. घर भाडे / शहर पुरक भत्ता मुख्यालय कोणते ठरविले जाईल त्यावर अवलंबून.
४. वाहतूक भत्ता अनुज्ञेय नाही.
५. आढावा तीन महिन्यानंतर घेण्यात यावा व निर्वाह भत्त्यांमध्ये.

क्रमशः

निर्वाह भत्ता

१. विलंबास प्रशासन जबाबदार असेल तर ५०% ने वाढ करावी.
२. विलंबास कर्मचारी जबाबदार असेल तर ५० % ने घट.
३. अंतिम वेतन रु. १००००/- असेल तर निर्वाह भत्ता रु.५०००/- ठरेल.

निर्वाह भत्ता ५०००/- + २५००/- = ७५००/- एवढा निर्वाह भत्ता वाढ केल्यानंतर.

निर्वाह भत्ता ५०००/- + २५००/- = ७५००/- एवढा निर्वाह भत्ता घट केल्यानंतर.

अ) वसुली

- सक्तीची.
- सरकारी निवासाची लायसेन्स फी.
- आयकर / गट विमा योजना.
- घरबांधणी / वाहन अग्रिम योजना.
- राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची वर्गणी (NPS).

ब) वैयल्पिक

- भविष्य निर्वाह निधी कर्ज हप्ता.
- विमा वर्गणी / पतपेढी वसुली.

क) वसुली करु नये.

- भविष्य निर्वाह निधी वर्गणी.
- न्यायालयीन टाच.
- शासकीय मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई.

निलंबनाचे नियमन

- विभागीय चौकशी / न्यायिक कार्यवाही यांच्या निकालाचे प्रत्येक प्रकरणातील गुणावगुणावर अवलंबून.
- न्यायीक कार्यवाही बाबत न्यायिक अधिकाऱ्याचे निकालात सांगितल्याप्रमाणे कार्यवाही.
- विभागीय चौकशीत निर्दोष - संपूर्ण निलंबन कर्तव्य काल व १००% वेतनभत्ते अनुज्ञेय.
- विभागीय चौकशीत दोषी - निलंबन काळ निलंबन म्हणून धरता येईल.

क्रमशः

निलंबनाचे नियमन

- विभागीय चौकशीत अंशत: दोषी.
- निलंबन काळ कोणत्या बाबींसाठी.
- कर्तव्य धरावयाचा याचा निर्णय गुणा अवगुणानुसार अवलंबून.
- विविक्षित बाबीसाठी कर्तव्यकाल धरण्यास १००% अनुज्ञेय न ठरविता वेतन भत्ते देय ठरवू शकतो.

प्राथमिक चौकशी

- तक्रारीची शहानिशा, सत्यता पडताळणे हा हेतु.
- तज्ज्ञ व्यक्तीस (अधिकाऱ्यास) हे काम सोपवावे.
- लेखा विषयक - लेखाधिकारी.
- प्रशासकीय विषयक - प्रशासकीय अधिकारी.
- तांत्रिक विषयक - तांत्रिक अधिकारी.
- प्राथमिक चौकशीचे अहवालाच्या आधारे चौकशीचा निर्णय.
- आरोपाचे गांभिर्य लक्षात घेता सौम्य अथवा गंभीर शिक्षेची कार्यवाही.

क्रमश:

प्राथमिक चौकशी

- सौम्य शिक्षेसाठी कार्यवाही केल्यानंतर गंभीर शिक्षा देता येणार नाही.
- गंभीर शिक्षेसाठी केलेल्या विभागीय चौकशीनंतर सौम्य शिक्षाही देता येईल.
- गंभीर शिक्षा विभागीय चौकशी नियम ८.
- दोषारोप स्विकारल्यास नियम ९ प्रमाणे शिक्षा प्रस्तावित अन्यथा.

क्रमश:

प्राथमिक चौकशी

- शिस्तभंग विषयक अधिकारी स्वत: चौकशी करु शकतो किंवा चौकशी अधिकारी नेमू शकतो.
- अराजपत्रित कर्मचाऱ्यासाठी शासन नामनिर्देशीत पॅनेलवरील सेवा निवृत्त अधिकाऱ्याची नेमणूक करता येईल.
- राजपत्रित कर्मचाऱ्याचे बाबतीत विभागीय आयुक्त कार्यालयातील चौकशी अधिकाऱ्याकडे सुपूर्त करता येईल.

दोषारोप पत्र

प्राथमिक चौकशीचे आधारे तयार करावे.

आरोप मोघम स्वरुपात नको तपशीलासह / प्राधिकारासह असावेत.

<u>चार भाग</u>

अ - संक्षिप्त स्वरुपात आरोपांचा उल्लेख.

ब - दोषारोपांचे विस्तृतीकरण (विवरणपत्र).

क - साक्षीदारांची नावे.

ड - दस्ताऐवजांची यादी.

क्रमश:

दोषारोप पत्र

- दोषारोप पत्र बजावून आपचाऱ्याची सही प्राप्त करावी.
- आपचारी / कर्मचारी उपलब्ध नसल्यास रजिस्टर पोष्टाने पाठवावा.
- लिफाफ्यावर दोषारोप पत्र असा उल्लेख करावा.
- आपचाऱ्याने नाकारल्यास पोष्ट विभागाचा अभिप्राय जतन करावा.
- त्या आधारे नवीन आरोप ठेवता येईल.

क्रमश:

दोषारोप पत्र

- विभागीय चौकशी अधिकारी नेमल्यावर सर्व कागदपत्रे / मुळ कागदपत्रे शिस्तभंग विषयक अधिकारी जपून ठेवतील.
- आपचाऱ्याचे दोषारोप पत्राची प्रत / त्याच्या बचावाची प्रत वा अन्य आवश्यक कागदपत्राच्या प्रती चौकशी अधिकाऱ्यास पुरवाव्यात.
- चौकशी अधिकाऱ्याचे मदतीसाठी प्रकरणाची माहिती असलेला सक्षम अधिकारी (प्रेझेंटींग ऑफीसर) म्हणून नेमावा.

क्रमश:

दोषारोप पत्र

- चौकशी अधिकारी ठरवील त्या तारखांना सर्व कागदपत्रासह, साक्षीदारांना उपस्थित ठेवण्याची जबाबदारी प्रेझेंटींग ऑफीसरची राहील.
- न्यायालयात सरकारी वकील जी भुमिका भार पाडतो ती प्रेझेंटींग ऑफीसरने पार पाडावी.
- अपचाऱ्यास 'बचाव सहाय्यक' नेमता येईल. बचाव सहाय्यक त्याच मुख्यालयातील असावा व त्याच्याकडे तीन पेक्षा जास्त प्रकरणे नसावीत.

क्रमश:

दोषारोप पत्र

- चौकशी अधिकारी रोजनाम्यासह सर्व साक्षीदार / अपचारी / प्रेझेंटींग ऑफीसर यांचे जबाब नोंदवून घेईल.
- प्रेझेंटींग ऑफीसर व बचाव सहाय्यक सरतपासणी, उलट तपासणी घेऊ शकतील.
- चौकशी संपताना प्रत्येक आरोप सिद्ध झाला अथवा नाही याचे तपशीलासह अहवाल शिस्तभंग प्राधिकाऱ्याकडे सादर करावा पण शिक्षा प्रस्तावित करु नये.
- सिद्ध व असिद्ध आरोपांबाबत शिस्तभंग विषयक अधिकारी आपले मत नोंदवील.

क्रमशः

दोषारोप पत्र

- चौकशीबाबत असमाधानी असल्यास फेरचौकशी आदेश देईल.
- चौकशी अधिकाऱ्याचा अहवालाची प्रत आपचाऱ्यास देण्यात यावी.
- राजपत्रीत कर्मचाऱ्याचे निवड जर लोकसेवा आयोगामार्फत असेल तर त्या प्रकरणी आयोगास सर्व माहिती द्यावी लागेल व सल्ला घ्यावा लागेल.
- सिद्ध आरोबाबत जी शिक्षा द्यावयाचे आहे त्याचे आदेश पारित करता येतील.
- परत बचावाची गरज नाही.

सौम्य शिक्षा कार्यवाही

- आरोपांचा सुस्पष्ट उल्लेख असलेले दोषारोप पत्र व प्रस्तावित शिक्षेचा मनोदय कर्मचाऱ्यास कळवावा व १० दिवसात खुलासा मागवावा.
- जिथे प्राथमिक चौकशीची आवश्यक असेल तिथे करावी.
- बचाव पत्राशी सहमत / असहमत याचे अभिप्राय प्रत्येक आरोपाबाबत नोंदवावा.
- लोकसेवा आयोगाचा जिथे आवश्यक तिथे सल्ला घ्यावा.

क्रमशः

सौम्य शिक्षा कार्यवाही

- निवृत्ती वेतनावर परिणाम करणारी अशी कोणतीही शिक्षा सौम्य शिक्षेची कार्यपद्धती वापरुन देता येणार नाही.
- अशा प्रकरणातही, आरोपपत्र, बचावाचे पत्र, पुरावे दस्तऐवज/ चौकशी बाबतचे अभिप्राय / लोकसेवा आयोगाचा सल्ला व शिक्षेचे आदेश हे रेकॉर्ड जपून ठेवावे.
- शिक्षेचा आदेश, चौकशीचा अहवाल असल्यास त्यावरील शिस्त विषयक प्राधिकाऱ्याचे अभिप्राय / लोकसेवा आयोगाचा सल्ला व सर्व बाबी कर्मचाऱ्यास कळवाव्यात.

अपिल

- निलंबन अथवा शिक्षेविरुद्ध अपिलाचा अधिकार आहे. निलंबन कालावधी ठरविण्याविरुद्ध अपील करता येईल.
- शिक्षा देण्याऱ्या अधिकाऱ्यास निकटतम वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.
- अपिलात शिक्षा कमी करता येईल अथवा वाढवता येईल किंवा रद्दही करता येईल.
- अपील एकाचा ठिकाणी करता येईल अपिलीय अधिकाऱ्याचे निर्णयावर परत अपील करता येणार नाही.
- शिक्षा वाढविताना परत बचावाची संधी द्यावी.
- राज्यपालांनी शिक्षा दिल्यास अपील करता येणार नाही.

पुर्नर्विलोकन

- शासन / नियुक्ती अधिकारी हे स्वत: होऊन कोणत्याही प्रकरणाचा आढावा घेऊ शकतील आणि त्या नंतर शिक्षा कायम / कमी / वाढवू शकतील किंवा संपूर्ण शिक्षा रद्द करु शकतील.
- कर्मचारीही पुर्न:निरिक्षणाची मागणी करु शकेल. परंतु त्यावर सहा महिन्याच्या आत निर्णय घ्यावा लागेल.

धन्यवाद !